# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk11@dte.org.in Internet :http/www.dte.org.in


क्रमांक : ११/तंशिसं/शा.वाहन माहिती/२०१३-१४/९२६०
दिनांक : 13 SEP 2013

प्रति,

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय : राज्य शासकीय वाहनांची सविस्तर माहिती ऑनलाईन संकलित करणेबाबत.
संदर्भ : १) शासन पत्र क्र. वाहन-२०१३/प्र.क्र.४५-२०१३/आस्था-२ दि. २९/०७/२०१३

उपरोक्त विषयासंदर्भाधीन शासन पत्राची सहपत्रासह प्रत सोबत जोडलेली आहे, त्याचे कृपया अवलोकन करावे.

सदर पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सदर पत्रासोबतच्या दि. ११/०६/२०१३ च्या पत्रात नमूद केलेल्या विवरण पत्रात नमूद केलेली माहिती आपल्या विभागातील अधिनस्त शासकीय संस्थांना पाठवून सदर माहिती संकलित करुन या कार्यालयास विना-विलंब सादर करण्यात यावी. तसेच सदर माहितीची आगाऊ प्रत ई-मेल द्वारे pdf format मध्ये htedest2@gmail.com वर त्वरित पाठवावी.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण, म.रा., मुंबई

पृष्ठांकन क्र. विकाऔ/भांडार/२०१३/ ७०३६
दिनांक : 20 SEP 2013

प्रति,
प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय / शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालस, औरंगाबाद
शासकीय तंत्रनिकेतने, औरंगाबाद/जालना/अंबड/जिंतुर/हिंगोली/नांदेड/बीड/ उस्मानाबाद/ पु.ला.शा.तं. लातुर/
शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, लातुर/उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद

यांना संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांची संदर्भीय पत्राची प्रत देऊन सुचित करण्यात येते की, आपल्या संस्थेत उपलब्ध असलेल्या शासकीय वाहनांची सविस्तर माहिती पत्रातील विहीत नमुन्यात तात्काळ या कार्यालयास सादर करण्यात यावी.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रत : या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना कार्यालयाच्या वेबसाईट व अपलोड

## महाराष्ट्र शासन

क्रमांक : वाहन-२०१३/प्र.क्र. ४५-२०१३/आस्था-२
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २९.७.२०१३

प्रति,

संचालक (उच्चशिक्षण / तंत्रशिक्षण / व्यवसायशिक्षण / व्यवसायप्रशिक्षण / कला / ग्रंथालय),
कक्ष अधिकारी (रोख शाखा),
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

**विषय :** राज्य शासकीय वाहनांची सविस्तर माहिती ऑनलाईन संकलित करण्याबाबत...

**महोदय,**

%

सोबत, उपरोक्त विषयासंदर्भातील वित्त विभागाचे पत्र क्रमांक सीओएम-२०११/प्र.क्र. ३६/ संगणक, दि. ११.६.२०१३ जोडले आहे.

वित्त विभागाचे सोबतचे पत्र स्वयंस्पष्ट असून, पत्रामध्ये नमूद केलेल्या विवरणपत्रात आवश्यक माहिती त्वरित उपलब्ध करुन देण्यात यावी, ही विनंती. सदर माहितीची आगाऊ प्रत ई-मेल द्वारे pdf format मध्ये htedest2@gmail.com वर पाठविण्यात यावी.

वित्त विभागास माहिती सादर करावयाची कालमर्यादा यापूर्वीच पार पडली असल्याने, सदर बाब तातडीची समजण्यात यावी, ही विनंती.

**आपला,**

संशचौबळ

**( सं. श. चौबळ )**
**कक्ष अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग**

पत्र प्राप्त झाले
3 0 JUL 2013
आवक लिपिक

श्री-२५०७७
१/८/१३

वित्त व लेखा विभाग
आवक 
दिनांक ...29/6/2013
आवक क्रमांक
2414
23/7/2013

८८०
२८/६/१३

महाराष्ट्र शासन

e-mail : us17.fd-mh@nic.in
asst22.fd-mh@nic.in

क्रमांक :- सीओएम - २०११/प्र.क्र.३६/संगणक
वित्त विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०००३२
दिनांक :- ११ जून, २०१३.

प्रति,

अमुस / प्र.स. / सचिव,
सर्व प्रशासकीय विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२

विषय :- राज्य शासकीय वाहनांची सविस्तर माहिती ऑनलाईन संकलीत करण्याबाबत.

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक वाहन-१०००/ प्र.क्र.६५/२००१/विनियम, दिनांक १०/ ९ /२००१

महोदय,

राज्य शासनाकडून प्रत्येक वाहनावर होणाऱ्या खालील खर्चाची व निर्लेखनादवारे जमा रकमेची माहिती ऑनलाईन संकलित करण्याकरीता नवीन संगणक प्रणाली ( VTS- vehicle tracking system ) वित्त विभागातर्फे विकसित करण्यात आली असून ती बीम्स ( BEAMS) प्रणालीशी जोडण्याचे काम सध्या प्रगतीपथावर आहे.

१. नवीन वाहन खरेदी वरील खर्च,
२. दैनंदिन इंधनावरील व ऑईल वरील खर्च,
३. देखभाल - दुरूस्ती वरील खर्च,
४. विमा काढला असल्यास त्यावरील खर्च ,
५. वाहन निर्लेखित केल्यानंतर जमा होणारी रक्कम

२. VTS प्रणालीमध्ये उपरोक्त खर्चाची डेटा एन्ट्री संबंधित DDO नी केल्यानंतर याच प्रणाली मधून BEAMS चे Authorizations generate होईल, अशाप्रकारची व्यवस्था करण्यात येत आहे. त्याकरीता BEAMS च्या सध्याच्या Authorization च्या Format मध्ये वाहनाचा क्रमांक, Major object आणि Minor object सांकेतांक समाविष्ट करणे गरजेचे आहे. आपल्या विभागातील व विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयांमधील सर्व DDO च्या अंतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय वाहनांवरील उपरोक्त खर्च कोणत्या Major object व Minor object खाली दर्शविण्यात येतो याबाबत खालील उदाहरणानुसार विहित विवरण पत्रात माहिती वित्त विभागास दिनांक ३०/०६/२०१३ पर्यंत सादर करावी.

H:\drive\surve\letter\३६-११-जून-१३.docx

उदा: - उद्दीष्ट क्रमांक ( Major Object ) - १३ - कार्यालयीन खर्च
सविस्तर उद्दीष्ट क्रमांक ( Minor Object ) - ८ - वाहनाची दुरूस्ती

विवरण पत्र

| अ.क्र. | उद्दीष्ट क्रमांक व तपशील | सविस्तर उद्दीष्ट क्रमांक व तपशील |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |
| ४ | | |
| ५ | | |
| ६ | | |

३. सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालये, महामंडळे, शासकीय उपक्रम इत्यादी कडून उपरोक्तनुसार माहिती या विभागाकडे विहित कालमर्यादेत प्राप्त होईल यादृष्टीने आवश्यक कार्यवाही करावी.

( वर्षा डोंगरे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मंत्रालयाच्या सर्व प्रशासनिक विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख व कार्यालय प्रमुख.
२. सर्व विभागीय आयुक्त
३. सर्व जिल्हाधिकारी
४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी ( जिल्हा परिषद )
५. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. संचालक, लेखा व कोषागारे.